**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :- ०३**

नगरसचिव कार्यालय
दिनांक :-२८ /०५/२०१३

प्रति,
मा. -------------------------------------

स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थायी समिती **सभा क्र. ०३ शनिवार दि. १ /०६/२०१३ रोजी दुपारी १.०० वाजता** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृह कार्यालयात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

सही /-
प्र. नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये.

**शनिवार दिनांक- ०१ /०६/२०१३ ची विषय पत्रिका.**

| **विषय क्र.** | **विषय सुची** |
|---|---|
| ११३ | अहमदनगर महानगरपालिकेचे प्रोफेसर कॉलनी शॉपींग सेंटर येथील गाळा क्रमांक-४६ लगत असलेली शेजारी (पश्चिमेला)मोकळी ही खुली जागा अर्जदार श्री. संजीव बन्सीलाल दायमा यांना जागा भाडेतत्वावर कराराने दरमहा भाडे व अनामत रक्कम घेउन देणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ११४ | अहमदनगर महानगरपालिकेचे पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात पंपचालक, विजतंत्री तांत्रिक पदांवर अटी व शर्ती नुसार सहा महिन्याकरिता मानधनावर करारबध्द नियुक्ती करणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ११५ | अहमदनगर महानगरपालिकेचे रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी तथा रक्त संक्रमण अधिकारी यापदी डॉ.सौ. रूपाली आनंद कुलकर्णी यांची अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरिता मानधनावर केलेल्या करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत. ऑफिस रिपोर्ट. |
| ११६ | अहमदनगर महानगरपालिकेचे रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्निशियन यापदी मोरे पल्लवी दगडू यांची अटी व शर्ती नुसार सहा महिन्याकरीता मानधनावर केलेल्या करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ११७ | अहमदनगर महानगरपालिकेचे मोटार व्हेईकल विभागाकरीता कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (ॲटोमोबाईल इंजि.) यापदी श्री. स्वप्निल बाळकृष्ण पवार यांची अटी व शर्ती नुसार सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द नियुक्ती करणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ११८ | मे.प्रसन्ना पर्पल मोबीलिटी सोल्यु. प्रा.लि.चे व्यवस्थापक श्री. दिपक मगर यांनी दिनांक २७/०५/२०१३ रोजी दिलेल्या पत्रानुसार अहमदनगर महानगरपालिका शहर बससेवा दि. १ जून २०१३ पासून बंद करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |

सही /-
प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

**सोबत-** विषय क्रमांक- ११३ ते ११८ च्या प्रस्तावाच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ०३**

विषय क्रमांक- ११३ शनिवार दिनांक १/०६/२०१३

ठराव क्रमांक -११३ शनिवार दिनांक १/०६/२०१३

**प्रस्तावाचा विषय:-**अहमदनगर महानगरपालिकेचे प्रोफेसर कॉलनी शॉपींग सेंटर येथील गाळा क्र.४६ लगत असलेली शेजारी (पश्चिमेला)मोकळी ही खुली जागा अर्जदार श्री.संजीव बन्सीलाल दायमा यांना जागा भाडेतत्वावर कराराने दरमहा भाडे व अनामत रक्कम घेउन देणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर म.न.पा. मार्केट विभाग दि.२६/१२/२०१२

उपरोक्त विषयास अनुसरून विनंती रिपोर्ट सादर करण्यात येतो की, प्रोफेसर कॉलनी शॉपींग सेंटर मध्ये दुकान क्र.४६ शेजारी (पश्चिमेला) मी मापाची खुली जागा सध्या भाडे कराराने वापरत आहे. या जागेच्या पाठीमागे सुमारे १०० स्वे. फुट जागा पडीक मुतारी म्हणुन खचलेल्या अवस्थेत आहे. ती जागा मला तात्पुरत्या स्वरूपात खचलेल्या अवस्थेत आहे. त्या स्वरूपात भाडे कराराने दिल्यास मापाला नियमीत भाडे अदा करू आवश्यक असेल त्यावेळी मी खाली करून देईल असा श्री. संजीव बन्सीलाल दायमा यांचा दि.१/११/२०१२ रोजी अर्ज मार्केट विभागास प्राप्त झालेला आहे.

तरी प्रोफेसर कॉलनी शॉपींग सेंटर येथील सर्व गाळे धारक व खुल्या जागा धारक यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ८१ ब (२) अन्वये गाळे, खुल्या जागा खाली करणेबाबत मार्केट विभाग जा.क्र.२५९ दि.४/८/२०१० अन्वये नोटीसा बजावून मा.आयुक्त यांच्या समोर दि.४/१०/२०१० रोजी सुनावणी देखील झालेली आहे. व सदर नोटीसीस अधिन राहुन संबंधितास बिले देणे व गाळा भाडे वसुल करण्यात येत आहे. सबब अर्जदार श्री. संजीव बन्सीलाल दायमा यांस दुकान क्र.४६ शेजारील (पश्चिमेला) खुली जागा व तद्लगतची मुतारी भाडेतत्वावर देणेबाबत मा. ज नगररचनाकार यांचा अभिप्राय घेणे योग्य वाटते. सबब आदेशार्थ सादर.

येणेप्रमाणे मार्केट विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

--**--

यावर उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, मान्य.

नगररचना विभाग दि.११/३/१३

सादर,

विषय- प्रोफेसर कॉलनी शॉपींग सेंटर दुकान क्र.४६ शेजारी मोकळी जागा भाडे दर कराराने मिळणेबाबत.

वरील विषयावये मार्केट विभाग प्रमुख यांनी इकडेस अहवाल देवुन श्री.संजीव बन्सीलाल दायमा यांस दुकान क्र.४६शेजारील (पश्चिमेला) खुली जागा व लगतची मुतारी भाडेतत्वावर देणेबाबत भाडेमुल्य ठरविणेबाबत कळविलेले आहे. त्यानुसार सदर जागेची प्रत्यक्ष पाहणी केली असता श्री. दायमा यांनी मागणी केलेली जागा ही सद्यस्थितीत पडीक व माडेकळीस आलेली आहे. तसेच त्याच्या लगत पडीक मुतारी असून सद्यस्थितीत त्याचा वापर चालू नाही. यापुर्वी श्री. संजय बन्सीलाल दायमा यांना दुकान क्र.४६च्या पश्चिमेकडील१०X१२फुट मोकळी जागा सन २००३ साली भाडेपटयाने दिलेली आहे. परंतु सद्यस्थितीत सदर ठिकाणी पक्के बांधकाम असून सदरचे जागेचे भाडेमुल्य काढताना आता

संपूर्ण जागेचे पुन्हा नव्याने भाडे ठरवणे योग्य होईल तसेच सदरची जागाही तात्पुरत्या स्वरूपात भाडयाने देणे व ज्यावेळेस मापास भविज्यात प्रकल्पासाठी सदर जागा ताब्यात दयावी लागेल अशी करारनाम्यात उल्लेख करणे योग्य होईल.

मूल्यांकन अहवाल खालीलप्रमाणे..

१] सदर जागेचा शिघ्रसिध्दगणकाचा सन २०१३ चा दर

फा. प्लॉट. नं. १२८= विभाग क्र.१५/३

जागेचा दर = ८४९० रू. प्रति चौ.मी.

२] आर.सी.सी. बांधकामाचा दर = १०२००%

सदरचे बांधकाम जवळपास ३० वर्षे जुने असल्याने ३० % घसाम धरल्यास

१०२००x ०.७०% = ७१४०%

उपरोक्त जागेतून मापास १२% दराने उत्पन्न मिळणे गृहीत धरल्यास

(७१४०+८४९०)x१२% = १८७५.६०

तसेच इतर खर्च (Outgoing) दुरूस्ती, देखभाल १५% धरल्यास येणारे भाडे

= १८७६/ ०.८५= २२०७.०० रू. प्रति चौ.मी. प्रति वर्ष

त्यानुसार प्रति महिना प्रति चौ.मी. येणारे भाडे = १८४.०० रू. प्रति चौ.मी. प्रति महिना

जागेचे क्षेत्र= ३.२ x६ = १९.२० m = १९.२०x१८४= ३५३० रू. प्रति महिना

त्यानुसार ३५३०/- रू. प्रति महिना भाडे आकारणे योग्य होईल तसेच अनामत रक्कम ४२३६०/- इतके आकारणे योग्य होईल असे मत आहे.

यापुर्वी इकडील कार्यालयाने सदरची जागा भाडेतत्वावर देता येणार नाही याबाबत जा.क्र. १३१३ दिनांक १६/७/०९ अन्वये अर्जदार यांस कळविलेले होते. परंतु सद्यस्थितीत मुतारी लगतची जागा ही पडीक असुन त्याचा कोणताही वापर नसून ती वापरात नाही. अर्जदार यांच्या मागणीप्रमाणे सदर जागा भाडेतत्वाने दिल्यास सदर जागा वापरात येवून मनपास दरमहा भाडे मिळुन उत्पन्नात वाढ घेईल त्यामुळे भविष्यात ज्यावेळेस सादर ठिकाणी प्रकल्प राबवायचा झाल्यास सदर जागा अर्जदार यास ताबडतोब खाली करून दयावी लागेल या अटीवर सदर जागा भाडेतत्वावर देणे योग्य होईल असे मत आहे. आदेशार्थ सादर./ **अ**

येणेप्रमाणे नगररचना विभाग लिपिक यांचा अहवाल असे.

--**--

यावर नगररचनाकार यांचा अभिप्राय की, **अ** मान्य

यावर मा.उपायुक्त (कर ) यांचा अभिप्राय की, सादर नगररचनाकार यांनी दिलेल्या सविस्तर अभिप्राय व अटी शर्ती नुसार मान्यता देणे योग्य. सबब आदेशार्थ तथा निर्णयास्तव मा.स्थायी समिती समोर ठेवणे उचित सबब आदेशार्थ.

यावर आयुक्त साहेब यांची अभिप्राय की, प्रस्तावानुसार मे. स्थायी समितीचे निर्णयास्तव सादर करणेस मान्यता देणेत येते.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**<u>चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- प्रोफेसर कॉलनी शॉपींग सेंटर येथील गाळा क्र.४६ लगत असलेली शेजारी (पश्चिमेला)मोकळी ही खुली जागा भाडेतत्वावर कराराने दरमहा भाडे व अनामत रक्कम घेउन देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.सौ.गंधे सु.मो. :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

ऑफिस रिपोर्ट वाचनू दाखविण्यांत आला.

मा.सौ. खरमाळे सं.र. :- किती वर्षाकरीता भाडेने दयायाचे आहे. जागा व भाडे किती आहे.

मार्केट प्रमुख श्री. दिवाण :- दरमहा भाडे रू.३५३०/- डिपॉसिट रू.४२३६०/- घेवून १९.२० चौ.मी जागा ३ वर्षाच्या करारावर मालमत्ताकर , विदयुत बील , इतर शासकीय कर भरणे तसेच प्रकल्प राबवयाचा झाल्यांस सदर जागा अर्जदार यांनी ताबडतोब खाली करून दयावी लागेल या अटी वर भाडे कराराने देण्यांत येणार आहे.

मा.सौ.खरमाळे स.रं.:-जागा भाडयाने देतांना करार वगैरे व्यवस्थित करून दया.ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री.डागवाले कि.आ. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**<u>ठराव :-</u>**अहमदनगर महानगरपालिकेचे प्रोफेसर कॉलनी शॉपींग सेंटर येथील गाळा क्र.-४६ शेजारी (पश्चिमेला ३.२x६=१९.२०चौ.मी.) या मोजमापाची जागा अर्जदार श्री. संजीव बन्सीलाल दायमा यांना मालमत्ता कर, विदयुत बिल,इतर कर विरहीत जागा भाडेतत्वावर ३ (तीन) वर्षासाठी कराराने दरमहा भाडे रूपये ३५३०/- (रूपये तीन हजार पाचशे तीस मात्र ) व अनामत रक्कम रूपये ४२,३६०/- (अक्षरी रूपये बेचाळीस हजार तीनशे साठ मात्र) घेउन महानगरपालिकेस भविष्यात प्रकल्पासाठी सदर जागा अर्जदार यांनी ताबडतोब खाली करून दयावी लागेल या अटीवर कराराने देण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावा.

सुचक :- मा.सौ. खरमाळे संगीता रत्नाकार सही /-

अनुमोदक :- मा.श्री. डागवाले किशोर आसाराम सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ०३**

विषय क्रमांक- ११४ शनिवार दिनांक १/०६/२०१३

ठराव क्रमांक - ११४ शनिवार दिनांक १/०६/२०१३

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात पंपचालक, विजतंत्री तांत्रिक पदांवर अटी व शर्ती नुसार सहा महिन्याकरिता मानधनावर करारबध्द नियुक्ती करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर म.न.पा. आस्थापना विभाग दि.१८/४/२०१३

संदर्भ : मा.मॅकेनिकल इंजि.,पाणि पुरवठा विभाग प्रमुख यांचे कडील जा.क्र.शहर पाणि पुरवठा योजना ७० दिनांक १७/४/२०१३ अन्वयेचा प्रस्ताव.

विनंती अहवाल सादर करण्यांत येतो की,मा.मॅकेनिकल इंजि.,पाणिपुरवठा विभाग प्रमुख यांनी त्यांचेकडील जा.क्र.शहर पाणि पुरवठा योजना ७०दिनांक १७/४/२०१३अन्वये प्रस्ताव सादर करुन त्यामध्ये"संदर्भिय पारीत आदेशानुसार अ.नगर महानगरपालिकेमध्ये पाणिपुरवठा अत्यावश्यक सेवेकरीता कंत्राटी करारानुसार खालील नमुद तांत्रिक हुद्याप्रमाणे तात्पुरत्या स्वरुपात पदांवर दि.२३/१०/२०१२रोजी पासुन ६ महिन्याकरीता निर्देशित अटी शर्तीप्रमाणे मानधनावर करारबध्द नेमणुका करण्यात आलेल्या आहेत. संदर्भिय आदेशातील पाणी पुरवठा विभागाकरीता नियुक्त केलेले सर्व कर्मचारी या विभागाकडे हजर झाल्यानंतर सर्वाची अहमदनगर महानगरपालिकेच्या शहर पाणी पुरवठा योजनेवर खालील निर्देशित ठिकाणी नेमणूक करण्यात आलेली आहे.परंतु कंत्राटी करारानुसार नेमणूक केलेल्या कर्मचा-यांची मुदत दि.२४/०४/२०१३रोजी पुर्वी संपुष्टात येणार आहे.त्यामुळे मुदतवाढ मिळणे खालील नमुद कर्मचारी यांनी दि.०५/०४/२०१३रोजी इकडेस विनंती अर्ज दिलेला आहे.

| अ.क्र. | कर्मचा-याचे नाव | हुद्दा | नेमणूक ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | नागापुरे संजय हिरामण | पंपचालक | नागापुर पाणी पुरवठा केंद्र |
| २ | गोरे कवि दशरथ | पंपचालक | विळद पाणी पुरवठा केंद्र |
| ३ | पुंड संदिप प्रभाकर | पंपचालक | मुळा नगर पंपीग स्टेशन |
| ४ | तांबे गौतम भास्कर | पंपचालक | मुळा नगर पंपीग स्टेशन |
| ५ | साळवे शरद मल्हारी | पंपचालक | विळद पंपींग स्टेशन |
| ६ | सागर आसाराम खताडे | वीज तंत्री | विळद पाणी पुरवठा केंद्र |
| ७ | नितीन किशोर हुशारे | विज तंत्री | विळद पाणी पुरवठा केंद्र |

या अनुषंगाने अहवाल सादर की,अहमदनगर शहर पाणी पुरवठा योजनेसह शहर पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेतील महत्वाची तांत्रिक रिक्त झालेली पदे व त्यामुळे निर्माण झालेली गंभीर परिस्थिती विचारात घेवून सध्या कार्यरत असणा-या प्रशिक्षीत व अनुभवी मजुर पदावरील कर्मचा-याना पदोन्नती देऊन कर्मचारी तातडीने भरणे बाबत आस्थापना विभागास वेळोवेळी कळविण्यात आलेले आहे.परंतु याबाबत अदयाप अंतिम कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे पाणी पुरवठा विभागा करीता मोठ्या प्रमाणात तांत्रिक कर्मचा-यांची आवश्यकता असल्याने कंत्राटी करारा नुसार वरील नमुद तांत्रिक हुद्या प्रमाणे तात्पुरत्या स्वरुपात पदांवर वरील नमुद कर्मचा-यांना नियमानुसार मुदतवाढ देणे/बाबत आस्थापना विभागास योग्य ते आदेश व्हावेत ."असे नमुद करुन सुचित केलेले आहे.

यापुर्वी मा.मॅकेनिकल इंजि.पाणि पुरवठा विभाग प्रमुख यांनी पाणि पुरवठा विभागामध्ये तांत्रिक कर्मचा-यांची संख्या अपुरी असल्याने नागरिकांना पाणि पुरवठा वितरण करणे मध्ये अनेक अडचणी निर्माण होत असल्याचे सुचीत केले होते.

त्यानुषंगाने पाणि पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेचा विचार करता कंत्राटी करारा नुसार पाणी पुरवठा विभागा करीता तात्पुरत्या स्वरुपात पंपचालक ,विज तंत्री यापदांवर सहा महिन्या करीता अटी व शर्ती नुसार दरमहा मानधनावर करारबध्द नियुक्ती करीता वेळोवेळी वर्तमान पत्रामध्ये जाहिराती प्रसिध्दीस देवुन **(Walk In Interview)** नुसार उमेदवारांच्या थेट पध्दतीने मुलाखती घेवुन उमेदवारांची निवड करुन पात्र ठरविण्यात आलेले होते.

त्यानुसार संबधितांची पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात तांत्रिक पदांवर अटी व शर्ती नुसार वेळोवेळी सहा महिन्या करीता दरमहा मानधनावर करारबध्द नियुक्त्या ह्या पाणी पुरवठा विभागामध्ये करण्यात आलेल्या आहेत.

सद्यस्थितीमध्ये खालील तक्त्यात दर्शविलेल्या प्रमाणे संबधितांची पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात नमुद केलेल्या पदांवर अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्या करीता दरमहा मानधनावर करारबध्द नियुक्ती करण्यात आलेली असुन त्याबाबतचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | नांव | तात्पुरत्या स्वरुपात पदनाम | दरमहा मानधन | जा.क्र.आस्था/कंत्राटी करारबध्द नेमणुक | मानधनावरील केलेल्या करारबध्दाची मुदत समाप्त दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | सागर आसाराम खताडे | विज तंत्री | ६,०००/- | ४३८३ दि.२३/१०/१२ अन्वये दि.३०/१०/१२ पासुन सहा महिन्या करीता | २९/४/१३ |
| २ | नितीन किशोर हुशारे | विज तंत्री | ६,०००/- | ४३८३दि.२३/१०/१२ अन्वये दि.३०/१०/१२ पासुन सहा महिन्या करीता | २९/४/२१३ |
| ३ | नागापुरे संजय हिरामण | पंपचालक | ६,०००/- | ४३८४ दि.२३/१०/१२अन्वये दि.२५/१०/१२ पासुन सहा महिन्या करीता | २४/४/१३ |
| ४ | साळवे शरद मल्हारी | पंपचालक | ६,०००/- | ४३८४ दि.२३/१०/१२अन्वये दि.२५/१०/१२ पासुन सहा महिन्या करीता | २४/४/१३ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५ | गोरे कवि दशरथ | पंपचालक | ६,०००/- | ४३८४ दि.२३/१०/१२अन्वये दि.२५/१०/१२ पासुन सहा महिन्या करीता | २४/४/१३ |
| ६ | पुंड संदिप प्रभाकर | पंपचालक | ६,०००/- | ४३८४ दि.२३/१०/१२अन्वये दि.२५/१०/१२ पासुन सहा महिन्या करीता | २४/४/१३ |
| ७ | तांबे गौतम भास्कर | पंपचालक | ६,०००/- | ४३८४ दि.२३/१०/१२अन्वये दि.२५/१०/१२ पासुन सहा महिन्या करीता | २४/४/१३ |

सदर वरील केलेल्या मानधनावरील करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव जा.क्र.आस्था.वर्कशीट २११ व २१२ दिनांक ३१/१०/२०१२ अन्वये मा.स्थायी समितीकडे पाठविण्यात आलेला होता.

सदरच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने मा.स्थायी समिती ठराव ५५ व ५६ दिनांक २३/११/२०१२ अन्वये ठराव पारित करुन सदर केलेल्या संबधितांच्या मानधनावरील कालावधीतील करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी दिलेली आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये खालील प्रमाणे नमुद केलेले आहे.

**५३:- नेमणुकीचा अधिकार कोणा मध्ये निहीत असणे.**

(१) महानगरपालिकेच्या जो अधिकारी सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे - मग असे अधिकारी तात्पुरते असोत किंवा कायम असोत- त्यांची नेमणूक करण्याचा अधिकार महानगरपालिकामध्ये निहीत असेल:

परंतु आयुक्ताला महानगरपालिकेच्या सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर असलेल्या कर्ज विषयक कामांसाठी करावयाच्या कोणत्याही अस्थायी - नेमणुका सहा महिन्यांहुन अधिक नसलेल्या कालावधीसाठी स्थायी समितीच्या पुर्व मंजुरीने या अटीवर करता येतील की आयुक्ताने अशी प्रत्येक नेमणुक करताना त्या विषयी महानगरपालिकेस ताबडतोब कळविले पाहीजे आणि उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर महानगरपालिकेच्या पुर्व मंजुरी वाचुन अशा कोणत्याही नेमणुकीचे नवीकरण करता येणार नाही.

(२) पोट-कलम(१)मध्ये अन्यथा तरतुद केली असेल त्याव्यतिरिक्त,नगरपालिका मुख लेखापरिक्षक व नगरपालिका सचिव यांच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखालील नगरपालिका अधिकारी व कर्मचारी-मग ते तात्पुरते असोत किंवा कायम असोत- यांची नेमणुक करण्याचा अधिकार कोणत्याही बाबतीत स्थायी समितीची मान्यता मिळविण्याचा अधीन,यथास्थिति,नगरपालिका मुख्यलेखापरिक्षक किंवा नगरपालिका सचिव यांच्याकडे निहीत असेल.मात्र,कोणत्याही विशिष्ट प्रकरणात किंवा प्रकरणांच्या वर्गात अशा मान्यतेची आवश्यकता नाही असे उक्त समितीने ठरविले तर अशी मान्यता घेण्याची आवश्यकता असणार नाही.

(३) या अधिनियमात अन्यथा तरतुद केली असेल त्याव्यतिरिक्त, नगरपालिका अधिकारी व कर्मचारी - मग ते कायम असोत किंवा तात्पुरते असोत- यांची नेमणुक करण्याचा अधिकार आयुक्तांकडे निहीत असेल ;

परंतु , कायम नेमणुकांच्या बाबतीत असा अधिकार कलम ५१ अन्वये तयार केलेल्या व मंजुर केलेल्या, त्यावेळी अंमलात असलेल्या विवरणपत्राच्या अधीन असेल :

आणखी असे की, आयुक्तास स्थायी समितीच्या पुर्व मंजुरी वाचुन कोणतीही तात्पुरती नेमणुक सहा महिन्यांहुन अधिक असेल अशा कोणत्याही कालावधीसाठी करता येणार नाही आणि लिपिक या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदाच्या वेतनाएवढे अथवा त्याहुन अधिक वेतन असलेल्या कोणत्याही नेमणुकीचे उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर नवीकरण करता येणार नाही ."असे नमुद केलेले आहे.

मा.मॅकेनिकल इंजि.पा.पु.विभाग प्रमुख यांचे उपरोक्त संदर्भिय जा.क्र.शहर पाणी पुरवठा विभाग ७० दिनांक १७/४/२०१३ च्या अहवालाच्या अनुषंगाने पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारा नुसार खालील तक्त्यात दर्शविलेल्यांची तात्पुरत्या स्वरुपात नमुद केलेल्या तांत्रिक पदांवर सदर केलेल्या कालावधीतील करारबध्दाची मुदत समाप्ती नंतर तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्या करीता नमुद केलेल्या दरमहा मानधनावर पाणी पुरवठा विभागामध्ये करारबध्द नियुक्ती करणे बाबत निर्णय झाल्यास सदरच्या प्रस्तावास पुर्व मंजुरी मिळणेसाठी मा.स्थायी समितीकडे सदरचा प्रस्ताव निर्णया करीता पाठविणे उचित वाटते.

| अ. क्र. | नांव | तात्पुरत्या स्वरुपात पदनाम | दरमहा मानधन रक्कम | रुजु होण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | सागर आसाराम खताडे | विज तंत्री | ६,०००/- | पा.पु.विभाग |
| २ | नितीन किशोर हुशारे | विज तंत्री | ६,०००/- | पा.पु.विभाग |
| ३ | नागापुरे संजय हिरामण | पंपचालक | ६,०००/- | पा.पु.विभाग |
| ४ | साळवे शरद मल्हारी | पंपचालक | ६,०००/- | पा.पु.विभाग |
| ५ | गोरे कवि दशरथ | पंपचालक | ६,०००/- | पा.पु.विभाग |
| ६ | पुंड संदिप प्रभाकर | पंपचालक | ६,०००/- | पा.पु.विभाग |
| ७ | तांबे गौतम भास्कर | पंपचालक | ६,०००/- | पा.पु.विभाग |

तरी मा.मॅकेनिकल इंजि.पा.पु.विभाग प्रमुख यांचेकडील उपरोक्त संदर्भिय जा.क्र.शहर पाणी पुरवठा विभाग ७० दि. १७/४/२०१३ च्या अहवालाच्या अनुषंगाने वरील तक्त्यात दर्शविलेल्यांची पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारा नुसार अटी व शर्ती प्रमाणे तात्पुरत्या स्वरुपात नमुद केलेल्या तांत्रिक पदांवर सदर केलेल्या मानधनावरील कालावधीतील करारबध्दाची मुदत समाप्ती नंतर तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्या करीता नमुद केलेल्या दरमहा मानधनावर पाणी पुरवठा विभागामध्ये करारबध्द नियुक्ती करणे बाबत मा.मुख्य लेखा परिक्षक व मा.मुख्य लेखाधिकारी यांचा अभिप्राय होवुन निर्णय झाल्यास सदरच्या प्रस्तावास पुर्व मंजुरी मिळणे करीता मा.स्थायी समितीकडे सदरचा प्रस्ताव निर्णया करीता पाठविणेस मंजुरीसाठी निर्णयास्तव आदेशार्थ सविनय सादर.

येणेप्रमाणे आस्थापान प्रमुख यांचा अहवाल असे.

--** --

यावर सहा. आयुक्त यांचा अभिप्राय की, मु.ले.प. / मु.ले. अ. यांचा अभिप्राय घेणे

यावर मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, प्रस्तावाप्रमाणे पाणीपुरवठा विभागाकरिता अत्यावश्यकसेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात तांत्रिक पदावर मनपाचे अटी व शर्ती नुसार तांत्रिक खंड देवुन सहा महिन्याकरिता दरमहा रक्कम रूपये ६०००/- मानधनावर नियुक्ती करिता मा.स्थायी समितीचे मान्यतेकरिता मा.स्थायी समिती समोर पाठविणेस मान्यतेस्तव सादर./**अ**

यावर उपायुक्त (सा.) यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत "**अ**" प्रमाणे मान्यतेस्तव सादर.

यावर आयुक्त साहेब यांची अभिप्राय की, **अ** नुसार मान्य.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात पंपचालक, विजतंत्री तांत्रिक पदांवर सहा महिन्याकरिता मानधनावर करारबध्द नियुक्ती करणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.सौ.गंधे सु.मो. :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

ऑफिस रिपोर्ट वाचनू दाखविण्यांत आला.

मा.सौ.खरमाळे सं.र. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री.कवडे उ.खं. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- महानगरपालिकेस असणारी तांत्रिक कर्मचा-यांची गरज विचारत घेता ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**ठराव :-**अहमदनगर महानगरपालिकेचे पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात ऑफिस रिपोर्टमध्ये नमूद पंपचालक, विजतंत्री या तांत्रिक पदांवर अटी व शर्तीनुसार सहा महिन्याकरिता दरमहा रक्कम रूपये६०००/-(रूपये सहा हजार ) मानधनावर करारबध्द नियुक्ती करणेस मंजुरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावा.

सुचक :- मा.सौ. खरमाळे संगीता रत्नाकर सही /-

अनुमोदक :- मा.श्री. कवडे उमेश खंडेराव. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ०३**

विषय क्रमांक- ११५ शनिवार दिनांक १/०६/२०१३

ठराव क्रमांक - ११५ शनिवार दिनांक १/०६/२०१३

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी तथा रक्त संक्रमण अधिकारी यापदी डॉ.सौ. रूपाली आनंद कुलकर्णी यांची अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरिता मानधनावर केलेल्या करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत. ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर म.न.पा. आस्थापना विभाग दि.१२/४/२०१३

संदर्भ :- कै.बा. दे. दवाखाना व सुतिका गृह जा.क्र.७० दि.१०/४/२०१३ अन्वयेचा प्रस्ताव.

विनंती अहवाल सादर करण्यांत येतो की, मा. प्र. मुख्य वैद्यकीय अधिकारी, कै.बा. दे. दवा. यांनी त्यांचेकडील जा.क्र.कै.बा.दे.दवाखाना व सुतिका गृह ७० दि.१०/४/२०१३ अन्वये त्यामध्ये "जा.क्र.आस्थापना कंत्राटी नेमणूक ४७८२ दि.१७/११/२०१२ अन्वये डॉ.सौ. रूपाली आनंद कुलकर्णी यांची वैद्यकीय अधिकारी रक्तपेढी विभाग या पदावर कंत्राटी पध्दतीने सहा महिन्या करीता नेमणूक करण्यांत आलेली होती. सदरच्या नेमणूकीचा कालावधी दिनांक ४/११/२०१२ ते दि.३/५/२०१३ असा असून सदरचा कालावधी दिनांक ३/५/२०१३ रोजी संपत आहे. सदरच्या कालावधीमध्ये त्यांचे काम समाधानकारक आहे. त्यांना पुढील कालावधीसाठी पुनर्नेमणूक करणेबाबत दिनांक ३/४/२०१३ रोजी विनंती अर्ज केलेला आहे. तरी त्यांना नियमाप्रमाणे एक दिवसाचा तांत्रिक खंड देवून ५/५/२००१३ ते ४/११/२०१३ अखेर सहा महिन्याकरीता वैद्यकीय अधिकारी रक्तपेढी विभाग या पदावर पुनर्नेमणूक करणेस शिफारस आहे. संबंधितास आदेशार्थ सविनय सादर." असे नमुद करून सुचित केलेले आहे.

सदर वरील प्रस्तावावर मा. प्र. आरोग्यधिकारी यांनी " प्रस्तावीत अ प्रमाणे नियमानुसार कंत्राटी पध्दतीने पुर्ननियुक्ती देणेस शिफारस आहे. मान्यतेस्तव तथापी आदेशार्थ सविनय सादर." असे नमुद करून सुचित केलेले आहे.सद्यस्थितीमध्ये प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी यांचे कडील जा.क्र.कै.बा.दे.दवा.व सुतिका गृह ७२० दि.२२/१०/२०१२ अन्वयेच्या अहवालाच्या अनुषंगाने रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी तथा रक्त संक्रमण अधिकारी या पदी अटी व शर्तीप्रमाणे सदरच्या नेमणूकीचा कालावधी दिनांक ३/५/२०१२ ते दि.२/११/२०१२ अखेर असल्याने सदरचा कालावधी दिनांक २/११/२०१२ रोजी संपत असल्याने त्यांचे काम समाधानकारक आहे. त्यांना एक दिवसाचा तांत्रिक खंड देवून ४/११/२०१२ ते ३/५/२०१३ अखेर सहा महिन्याकरीता मानधनावर पुनर्नेमणूक करण बाबत सुचित केलेले होते.त्यानुसार सदरच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने दि.६/११/२०१२ रोजी प्रस्ताव सादर करून मान्यतेनुसार जा.क्र.आस्था./कंत्राटी करारबध्द ४७८२ दि.१७/११/२०१२ अन्वये रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी तथा रक्त संक्रमण अधिकारी या पदी डॉ.सौ. रूपाली आनंद कुलकर्णी यांची अटी व शर्तीप्रमाणे तांत्रिक खंड देवून दिनांक ४/११/२०१२ ते ३/५/२०१३ अखेर सहा महिन्याकरीता दरमहा रूपये २५,०००/- (अक्षरी रूपये पंचवीस हजार फक्त) या मानधनावर रक्तपेढी विभागामध्ये करारबध्द नियुक्ती करण्यांत आलेली आहे.

डॉ.सौ. रूपाली आनंद कुलकर्णी यांची सदर करील केलेल्या दरमहा मानधनावरील करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजूरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव इकडील जा.क्र.आस्था./वर्कशीट २२७ दि.१/१२/२०१२ अन्वये मा. स्थायी समितीकडे पाठविण्यांत आलेला होता.

सदर प्रस्तावावर मा. स्थायी समितीने स्थायी समिती ठराव क्रमांक ६९ दि.१७/१२/२०१२ अन्वये खालील प्रमाणे ठराव पारीत केलेला आहे.

" ऑफिस रिपोर्टानुसार अहमदनगर महानगरपालिकेचे रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेकरीता डॉ.सौ. रूपाली आनंद कुलकर्णी यांची तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी तथा रक्त संक्रमण अधिकारी या पदावर अटी व शर्तीप्रमाणे कंत्राटी करारानुसार दरमहा रूपये २५,०००/-(रूपये पंचवीस हजार फक्त) या मानधनावर दिनांक ४/११/२०१२ ते ३/५/२०१३ अखेर सहा महिना कालावधी करीता केलेल्या करारबध्द नेमणूकीस कार्योत्तर मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर, नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी."

डॉ.सौ. रूपाली आनंद कुलकर्णी यांची जा.क्र.आस्था./ कंत्राटी करारबध्द नेमणूक ४७८२ दि.१७/११/२०१२ अन्वये अटी व शर्तीप्रमाणे केलेल्या मानधनावरील करारबध्द कालावधीतील नियुक्तीची मुदत ही दिनांक ४/५/२०१३ पासून समाप्त होत आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये खालील प्रमाणे नमुद केलेले आहे.

**५३:- नेमणुकीचा अधिकार कोणा मध्ये निहीत असणे.**

(१) महानगरपालिकेच्या जो अधिकारी सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे - मग असे अधिकारी तात्पुरते असोत किंवा कायम असोत- त्यांची नेमणूक करण्याचा अधिकार महानगरपालिकामध्ये निहीत असेलः

परंतु आयुक्ताला महानगरपालिकेच्या सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर असलेल्या कर्ज विषयक कामांसाठी करावयाच्या कोणत्याही अस्थायी - नेमणुका सहा महिन्यांहुन अधिक नसलेल्या कालावधीसाठी स्थायी समितीच्या पुर्व मंजुरीने या अटीवर करता येतील की आयुक्ताने अशी प्रत्येक नेमणुक करताना त्या विषयी महानगरपालिकेस ताबडतोब कळविले पाहीजे आणि उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर महानगरपालिकेच्या पुर्व मंजुरी वाचुन अशा कोणत्याही नेमणुकीचे नवीकरण करता येणार नाही.

(२) पोट- कलम (१) मध्ये अन्यथा तरतुद केली असेल त्याव्यतिरिक्त, नगरपालिका मुख लेखापरिक्षक व नगरपालिका सचिव यांच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखालील नगरपालिका अधिकारी व कर्मचारी-मग ते तात्पुरते असोत किंवा कायम असोत - यांची नेमणुक करण्याचा अधिकार कोणत्याही बाबतीत स्थायी समितीची मान्यता मिळविण्याचा अधीन, यथास्थिति, नगरपालिका मुख्य लेखापरिक्षक किंवा नगरपालिका सचिव यांच्याकडे निहीत असेल.मात्र , कोणत्याही विशिष्ट प्रकरणात किंवा प्रकरणांच्या वर्गात अशा मान्यतेची आवश्यकता नाही असे उक्त समितीने ठरविले तर अशी मान्यता घेण्याची आवश्यकता असणार नाही.

(३) या अधिनियमात अन्यथा तरतुद केली असेल त्याव्यतिरिक्त, नगरपालिका अधिकारी व कर्मचारी - मग ते कायम असोत किंवा तात्पुरते असोत- यांची नेमणुक करण्याचा अधिकार आयुक्तांकडे निहीत असेल ;

परंतु,कायम नेमणुकांच्या बाबतीत असा अधिकार कलम५१अन्वये तयार केलेल्या व मंजुर केलेल्या,त्यावेळी अंमलात असलेल्या विवरणपत्राच्या अधीन असेल:आणखी असे की, आयुक्तास स्थायीसमितीच्या पुर्व मंजुरी वाचुन कोणतीही तात्पुरती नेमणुक सहामहिन्यांहुन अधिक असेल अशा कोणत्याही कालावधीसाठी करता येणार नाही आणि लिपिक यापदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्चदर्जाच्या पदाच्या वेतनाएवढे अथवा त्याहुन अधिक वेतन असलेल्या कोणत्याहीनेमणुकीचे उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतरनवीकरण करता येणार नाही."असे नमुद केलेले आहे.

यापुर्वी फिरता दवाखान्याकरिता तात्पुरत्या स्वरुपात वैद्यकीय अधिकारी या पदी कंत्राटी करारानुसार दरमहा करारबध्द नियुक्ती मानधनावरचा प्रस्ताव निर्णयासाठी मा.स्थायी समितीकडे पाठविण्यांत आलेला होता. सदर प्रस्तावावर मा.स्थायी समितीने ठराव क्र.१३ दि.३०/४/२०१० अन्वये ठराव पारित होवुन त्यामध्ये परिच्छेद २ मध्ये खालीलप्रमाणे ठरावामध्ये नमुद केलेले आहे.

" तसेच नागरिकांच्या सुविधेच्या दृष्टीकोनातुन फिरता दवाखाना तसेच आरोग्याच्या सर्व सेवा अत्यावश्यक असल्याने यापुढे वैद्यकीय अधिकारी,लॅब टेक्नीशियन,नर्सेस इ.चे काम समाधानकारक असल्यास त्यांचे पुर्ननेमणूक एक दिवस तांत्रिक खंड देवुन त्यांना नेमणूका देण्यांत याव्यात व प्रस्ताव अंतिम मंजुरीसाठी मा.स्थायी समितीकडे पाठविण्यांत यावेत"असे नमुद करुन सुचित केलेले आहे.

वरील कै. बा. दे. दवा. व सुतिका गृह जा.क्र.७० दि.१०/४/२०१३ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने रक्तपेढी विभागाकरीता डॉ.सौ. रूपाली आनंद कुलकर्णी यांची कंत्राटी कराराप्रमाणे अटी व शर्तीनुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी तथा रक्त संक्रमण अधिकारी यापदी तांत्रिक खंड देवून दिनांक ५/५/२०१३ पासुन सहा महिन्याच्या कालावधी करीता रू.२५,०००/- (अक्षरी रु. पंचवीस हजार फक्त) या दरमहा मानधनावर करारबध्द नियुक्ती करणे बाबत निर्णय झाल्यास उपरोक्त मा. स्थायी समिती ठराव क्रमांक १३ दिनांक ३०/४/२०१० च्या पारीत झालेल्या ठरावाच्या अनुषंगाने सदर वरिल कालावधीमध्ये करारबध्द नियुक्ती करुन सदर केलेल्या करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजूरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समितीकडे पाठवावा लागेल.

तरी या बाबत मा. मुख्यलेखा परिक्षक व मा. मुख्य लेखाधिकारी यांचा अभिप्राय होवून सदरचा प्रस्ताव निर्णयास्तव करीता आदेशार्थ सविनय सादर.

**सोबतः-** सदर कंत्राटी कराराप्रमाणे अटी व शर्तीनुसार मानधनावर
करारबध्दसाठी नियुक्ती आदेशाबाबतचा प्रारूप मसुदा

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर सहा. आयुक्त यांचा अभिप्राय की, मु.ले.प. / मु.ले. प. यांचा अभिप्राय घेणे

यावर मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, प्रस्तावाप्रमाणे रक्तपेढी विभागासाठी अत्यावश्यक सेवेकरीता कंत्राटी करारानुसार तांत्रिक खंड तात्पुत्या स्वरूपात ६ महिन्याकरिता मनपाचे अटी व शर्ती नुसार वैद्यकीय अधिकारी या पदावर दरमहा रक्कम रू.२५०००/- मानधनावर नियुक्ती करणेस व अखेर मान्यतेकरिता मा.स्थायी समिती समोर प्रस्ताव ठेवणेस मान्यतेस सादर.**/अ**

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत **"अ"** प्रमाणे मान्यतेस्तव सादर.

यावर आयुक्त साहेब यांची अभिप्राय की **"अ"** नुसार मान्य.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**<u>चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी तथा रक्त संक्रमण अधिकारी यापदी डॉ.सौ. रूपाली आनंद कुलकर्णी यांची सहा महिन्याकरिता मानधनावर केलेल्या करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.सौ.गंधे सु.मो. :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

ऑफिस रिपोर्ट वाचनू दाखविण्यांत आला.

मा.सौ.गंधे सु.मो. :- कार्योत्तर मंजूरी असल्याने ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. सातपुते दि.ना. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- कार्योत्तर मंजूरी असल्याने ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिकेचे रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी तथा रक्त संक्रमण अधिकारी यापदी डॉ.सौ. रूपाली आनंद कुलकर्णी यांची अटी व शर्ती नुसार दिनांक ५/५/२०१३ पासून सहा महिन्याकरिता मानधनावर केलेल्या करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावा.

सुचक :- मा.सौ. गंधे सुमन मोहनीराज सही /-

अनुमोदक :- मा.श्री. सातपुते दिलीप नानाभाउ सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-

सभापती,

स्थायी समिती

अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ०३**

विषय क्रमांक- ११६ शनिवार दिनांक १/०६/२०१३

ठराव क्रमांक - ११६ शनिवार दिनांक १/०६/२०१३

**प्रस्तावाचा विषय:-** अहमदनगर महानगरपालिकेचे रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारा नुसार तात्पुरत्या स्वरूपात लॅबटेक्निशियन यापदी मोरे पल्लवी दगडू यांची अटी व शर्तीनुसार सहा महिन्याकरीता मानधनावर केलेल्या करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर म.न.पा. आस्थापना विभाग दि.१५/४/२०१३

संदर्भ :- रक्तपेढी विभाग जा.क्र.१२ दि.१२/४/२०१३ अन्वयेचा प्रस्ताव.

विनंती अहवाल सादर करण्यांत येतो की, रक्तपेढी विभाग जा.क्र. १२ दिनांक १२/४/२०१३ अन्वये प्रस्ताव सादर करून त्यामध्ये "जा.क्र.आस्थापना कंत्राटी नेमणूक ४७८१ दि.१७/११/२०१२ अन्वये रक्तपेढी लॅब टेक्निशियन या पदावर कंत्राटी पध्दतीने सहा महीन्या करीता नेमणूक करण्यांत आलेली होती. सदरच्या नेमणूकीचा कालावधी दिनांक २०/११/२०१२ ते १९/५/२०१३ असा असून सदरचा कालावधी दिनांक १९/५/२०१३ रोजी संपत आहे. सदरच्या कालावधीमध्ये त्यांचे काम समाधानकारक आहे. त्यांनी पुढील कालावधीसाठी पुनर्नेमणूक करणे बाबत दिनांक ५/४/२०१३ रोजी विनंती अर्ज केलेला आहे. तरी त्यांना नियमाप्रमाणे एक दिवसाचा तांत्रिक खंड देवून २१/५/२०१३ ते २०/११/२०१३ अखेर सहा महिन्या करीता लॅब टेक्निशियन रक्तपेढी विभाग या पदावर पुनर्नेमणूक करणेस शिफारस आहे." असे नमुद करून सूचित केलेले आहे.

सदर वरिल प्रस्तावावर मा. प्र. आरोग्यधिकारी यांनी " प्रस्तावीत " अ " प्रमाणे कंत्राटी पध्दतीने पुढील ६ महिन्या करीता पुर्ननियुक्ती देणेस शिफारस आहे. तथापी आस्थापना विभागास आदेशार्थ सविनय सादर." असे नमुद करून सुचित केलेले आहे.

सद्यस्थितीमध्ये रक्तपेढी विभाग जा.क्र.१३५ दि.१/११/२०१२ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्निशियन यापदी कंत्राटी करारानुसार श्रीमती मोरे पल्लवी दगडू यांची जा.क्र.आस्थापना / कंत्राटी करारबध्द नेमणूक ४७८१ दिनांक १७/११/२०१२ अन्वये दिनांक २०/११/२०१२ पासून सहा महिन्या करीता अटी व शर्ती व शर्तीनुसार रू.१३,०००/- या दरमहा मानधनावर रक्तपेढी विभागामध्ये करारबध्द नियुक्ती करण्यांत आलेली आहे. सदरच्या कालावधीतील केलेल्या अटी व शर्तीनुसार मानधनावरील करारबध्द नियुक्तीची मुदत ही दिनांक १९/५/२०१३ रोजी समाप्त होत आहे.

वरील कंत्राटी करारबध्द मानधनावरील कालावधीतील केलेल्या करारब्ध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजूरी मिळणेकरीता सदरचा प्रस्ताव इकडील जा.क्र.आस्था./वर्क.२२६ दिनांक १/१२/२०१२ अन्वये मा. स्थायी समितीकडे पाठविण्यांत आलेला होता. सदरच्या प्रस्तावास मा. स्थायी समितीने स्थायी समिती ठराव क्रमांक ६८ दि.१७/१२/२०१२ अन्वये ठराव पारीत करून त्यास कार्योत्तर मंजूरी दिलेली आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये खालील प्रमाणे नमुद केलेले आहे.

**५३:- नेमणुकीचा अधिकार कोणा मध्ये निहीत असणे.**

(१) महानगरपालिकेच्या जो अधिकारी सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे - मग असे अधिकारी तात्पुरते असोत किंवा कायम असोत- त्यांची नेमणूक करण्याचा अधिकार महानगरपालिकामध्ये निहीत असेल:

परंतु आयुक्ताला महानगरपालिकेच्या सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर असलेल्या कर्ज विषयक कामांसाठी करावयाच्या कोणत्याही अस्थायी - नेमणुका सहा महिन्यांहुन अधिक नसलेल्या कालावधीसाठी स्थायी समितीच्या पुर्व मंजुरीने या अटीवर करता येतील की आयुक्ताने अशी प्रत्येक नेमणुक करताना त्या विषयी महानगरपालिकेस ताबडतोब कळविले पाहीजे आणि उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर महानगरपालिकेच्या पुर्व मंजुरी वाचुन अशा कोणत्याही नेमणुकीचे नवीकरण करता येणार नाही.

(२) पोट - कलम (१) मध्ये अन्यथा तरतुद केली असेल त्याव्यतिरिक्त, नगरपालिका मुख लेखापरिक्षक व नगरपालिका सचिव यांच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखालील नगरपालिका अधिकारी व कर्मचारी-मग ते तात्पुरते असोत किंवा कायम असोत - यांची नेमणुक करण्याचा अधिकार कोणत्याही बाबतीत स्थायी समितीची मान्यता मिळविण्याचा अधीन, यथास्थिति, नगरपालिका मुख्य लेखापरिक्षक किंवा नगरपालिका सचिव यांच्याकडे निहीत असेल.मात्र , कोणत्याही विशिष्ट प्रकरणात किंवा प्रकरणांच्या वर्गात अशा मान्यतेची आवश्यकता नाही असे उक्त समितीने ठरविले तर अशी मान्यता घेण्याची आवश्यकता असणार नाही.

(३) या अधिनियमात अन्यथा तरतुद केली असेल त्याव्यतिरिक्त, नगरपालिका अधिकारी व कर्मचारी - मग ते कायम असोत किंवा तात्पुरते असोत- यांची नेमणुक करण्याचा अधिकार आयुक्तांकडे निहीत असेल ;

परंतु , कायम नेमणुकांच्या बाबतीत असा अधिकार कलम ५१ अन्वये तयार केलेल्या व मंजुर केलेल्या, त्यावेळी अंमलात असलेल्या विवरणपत्राच्या अधीन असेल :

आणखी असे की, आयुक्तास स्थायी समितीच्या पुर्व मंजुरी वाचुन कोणतीही तात्पुरती नेमणुक सहा महिन्यांहुन अधिक असेल अशा कोणत्याही कालावधीसाठी करता येणार नाही आणि लिपिक या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदाच्या वेतनाएवढे अथवा त्याहुन अधिक वेतन असलेल्या कोणत्याही नेमणुकीचे उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर नवीकरण करता येणार नाही ."असे नमुद केलेले आहे.

यापुर्वी फिरत्या दवाखान्या करीता तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी या पदावर कंत्राटी करारानुसार दरमहा मानधनावरचा प्रस्ताव निर्णयासाठी मा. स्थायी समितीकडे पाठविण्यांत आलेला होता. सदर प्रस्तावावर मा. स्थायी समिती ठराव क्रमांक १३ दिनांक ३०/४/२०१० अन्वये ठराव पारीत होवून त्यामध्ये परिच्छेद २ मध्ये खालीलप्रमाणे नमुद केलेले आहे.

" तसेच नागरिकांच्या सुविधेच्या दृष्टीकोनातून फिरत्या दवाखाना तसेच आरोग्याच्या सर्व सेवा अत्यावश्यक असल्याने यापुढे वैद्यकीय अधिकारी, लॅब टेक्निश्यिन, नर्सेस इ. चे काम समाधानकारक असल्यास त्यांचे पुनर्नेमणूक १ दिवस तांत्रिक खंड देवून त्यांना नेमणूका देण्यांत याव्यात व प्रस्ताव अंतीम मंजूरीसाठी मा. स्थायी समितीकडे पाठविण्यांत यावेत." असे नमुद करून सुचित केलेले आहे.

वरील संदर्भिय रक्तपेढी विभाग जा.क्र.१२ दि.१२/४/२०१३ च्या प्रस्तावाच्या अनुषंगाने रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेकरीता मोरे पल्लवी दगडू यांची कंत्राटी कराराप्रमाणे अटी व शर्तीनुसार तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्निशियन या पदी एक दिवसांचा तांत्रिक खंड देवून दिनांक २१/५/२०१३ पासून सहा महिन्याकरीता रू.१३,०००/- (अक्षरी रूपये तेरा हजार) या दरमहा मानधनावर रक्तपेढी विभागामध्ये करारबध्द नियुक्ती करणे बाबत निर्णय झाल्यास उपरोक्त मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १३ दिनांक ३०/४/२०१० च्या पारीत झालेल्या ठरावाच्या अनुषंगाने सदर वरील कंत्राटी करारानुसार कालावधीमध्ये करारबध्द नियुक्ती करुन सदर केलेल्या करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजूरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समितीकडे पाठवावा लागेल.

तरी याबाबत मुख्य लेखा परिक्षक व मा. मुख्य लेखाधिकारी यांचा अभिप्राय होवून सदरचा प्रस्ताव निर्णयास्तव आदेशार्थ सविनय सादर.

**सोबतः-** सदर कंत्राटी कराराप्रमाणे अटी व शर्तीनुसार
मानधनावर करारबध्दसाठी नियुक्ती आदेशा
बाबतचा प्रारूप मसुदा.

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर सहा. आयुक्त यांचा अभिप्राय की, मु.ले.प. / मु.ले. प. यांचा अभिप्राय घेणे

यावर मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, प्रस्तावाप्रमाणे रक्तपेढी विभागासाठी लॅब टेक्नीशियन पदावर कंत्राटी करारानुसार सहा महिनाकरिता तात्पुत्या स्वरूपात तांत्रिक खंड देवुन दरमहा रू.१३०००/- मानधनवार नियुक्ती करणेस व अखरे मान्यतेकरिता प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर निर्णयास्तव ठेवणेस मान्यतेस सादर./**अ**

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत **"अ"** प्रमाणे मान्यतेस्तव सादर.

यावर आयुक्त साहेब यांची अभिप्राय की **"अ"** नुसार मान्य.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

## चर्चा :-

मा.सभापती साहेब :- रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारा नुसार तात्पुरत्या स्वरूपात लॅबटेक्निशियन यापदी मोरे पल्लवी दगडू यांची सहा महिन्याकरीता मानधनावर केलेल्या करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजूरी मिळणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.सौ.गंधे सु.मो. :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

ऑफिस रिपोर्ट वाचनू दाखविण्यांत आला.

मा.सौ.गंधे सु.मो. :- कार्योत्तर मंजूरी असल्याने ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. सातपुते दि.ना. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- कार्योत्तर मंजूरी असल्याने ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारा नुसार तात्पुरत्या स्वरूपात लॅबटेक्निशियन यापदी मोरे पल्लवी दगडू यांची अटी व शर्तीनुसार दिनांक २१/५/२०१३ पासून  सहा महिन्याकरीता मानधनावर केलेल्या करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावा.

सुचक :- मा.सौ. गंधे सुमन मोहनीराज    सही /-

अनुमोदक :- मा.श्री. सातपुते दिलीप नानाभाउ    सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ०३**

विषय क्रमांक- ११७ शनिवार दिनांक १/०६/२०१३

ठराव क्रमांक - ११७ शनिवार दिनांक १/०६/२०१३

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे मोटार व्हेईकल विभागाकरीता कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (ॲटोमोबाईल इंजि.) यापदी श्री. स्वप्निल बाळकृष्ण पवार यांची अटी व शर्ती नुसार सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द नियुक्ती करणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर म.न.पा. आस्थापना विभाग दि.१२/४/२०१३

संदर्भ :- मा. मॅकेनिकल इंजि. यांचेकडील जा.क्र. ३ मोटार व्हेईकल विभाग
दि.१०/४/२०१३ अन्वयेचा अहवाल.

विनंती अहवाल सादर करण्यांत येतो की, श्री. स्वप्निल बाळकृष्ण पवार यांनी दि.८/४/२०१३ रोजी अर्ज देवून त्यामध्ये "मी स्वप्निल बाळकृष्ण पवार, कनिष्ठ अभियंता, ऑटोमोबाईल इंजिनियर (स्वयंचलित यांत्रिकी) या कंत्राटी पदावर दि.१०/१२/२०१० पासून मोटार व्हेईकल विभागामध्ये महानगरपालिकेच्या मालकीचे सर्व विभागाकडील वाहनांची दुरूस्ती बाबतचे काम पाहणे कामी नेमणुक आहे. तरी ही मुदत ६ महिन्यासाठी होती ती दि.५/५/२०१३ रोजी संपत आहे. मला या विभागामध्ये पुन्हा काम करण्याची इच्छा आहे. त्या अनुषंगाने मला सेवेत मुदतवाढ मिळावी" असे नमुद करून विनंती केलेली आहे.

सदर अर्जावर मा. मॅकेनिकल इंजिनियर यांनी जा.क्र. मोटार व्हेईकल विभाग ३ दि.१०/४/२०१३ अन्वये " अर्जदार यांचे अर्जावर नियमानुसार कार्यवाही करणेस्तव आस्थापना विभागास अर्ज पाठविणे मंजूरीस्तव सादर." असे नमुद करून सुचित केलेले आहे.

यापुर्वी मोटार व्हेईकल विभागाच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने अहमदनगर महानगरपालिकेच्या मोटार व्हेईकल विभागाकरिता कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता या पदांवर अटी व शर्ती प्रमाणे श्री. स्वप्निल बाळकृष्ण पवार यांची तांत्रिक खंड देवून सहा महिन्याकरीता मानधनावर मोटार व्हेईकल विभागामध्ये करारबध्द नियुक्ती करण्यांत आलेल्या आहेत.

सद्यस्थितीमध्ये मा. मॅकेनिकल इंजिनियर यांचेकडील जा.क्र.मोटार व्हेईकल विभाग ८३ दि.२३/८/२०१२ च्या प्रस्तावाच्या अनुषंगाने मोटार व्हेईकल विभागाकरीता कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात ॲटोमोबाईल इंजिनियर (कनिष्ठ अभियंता) या पदावर अटी व शर्तीनुसार श्री. स्वप्निल बाळकृष्ण पवार यांची तांत्रिक खंड देवून सहा महिन्याकरीता दरमहा रू.२०,०००/- या मानधनावर करारबध्द नियुक्ती करणे बाबत सदरचा प्रस्ताव जा.क्र.आस्था/ वर्क २०४ दि.६/१०/२०१२ अन्वये मा.स्थायी समितीकडे निर्णयास्तव पाठविण्यांत आलेला होता.

सदर प्रस्तावावर मा. स्थायी समिती ठराव क्रमांक ४६ दि.१७/१०/२०१२ अन्वये खालील प्रमाणे ठराव पारीत केलेला होता.

" अहमदनगर महानगरपालिकेचे मोटार व्हेईकल विभागा करीता श्री. स्वप्निल बाळकृष्ण पवार यांची कनिष्ठ अभियंता (ॲटोमोबाईल इंजिनियर) या पदी अटी व शर्तीनुसार कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात दरमहा रूपये २०,०००/- (रूपये वीस हजार फक्त) चे मानधनावर तांत्रिक खंड देवून सहा महिन्याकरीता करारबध्द नियुक्ती करणेस मंजूरी देण्यांत येत आहे." ऑफिस रिपोर्ट मंजूर खर्च मंजूर. नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

उपरोक्त वरिल ठरावाच्या अनुषंगाने दि.२३/१०/२०१२ रोजी प्रस्ताव सादर केला असता सदर प्रस्तावावरील मंजूरीच्या अनुषंगाने जा.क्र. आस्था/ कंत्राटी करारबध्द नेमणूक ४६१५ दि.६/११/२०१२ अन्वये मोटार व्हेईकल विभागाकरीता कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (ॲटोमोबाईल इंजिनियर ) यापदी श्री. स्वप्निल बाळकृष्ण पवार यांची अटी व शर्तीप्रमाणे तांत्रिक खंड देवून दि.७/११/२०१२ पासून सहा महिन्याकरीता दरमहा रूपये २०,०००/- या मानधनावर मोटार व्हेईकल विभागामध्ये करारबध्द नियुक्ती करण्यांत आलेली आहे.

सदरच्या जा.क्र.आस्था/ कंत्राटी करारबध्द नेमणूक ४६१५ दि.६/११/२०१२ अन्वये केलेल्या दरमहा मानधनावरील कालावधीतील करारबध्दाची मुदत ही दि.६/५/२०१३ रोजी समाप्त होणार आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये खालील प्रमाणे नमुद केलेले आहे.

**५३:- नेमणुकीचा अधिकार कोणा मध्ये निहीत असणे.**

(१) महानगरपालिकेच्या जो अधिकारी सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे - मग असे अधिकारी तात्पुरते असोत किंवा कायम असोत- त्यांची नेमणूक करण्याचा अधिकार महानगरपालिकामध्ये निहीत असेलः

परंतु आयुक्ताला महानगरपालिकेच्या सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर असलेल्या कर्ज विषयक कामांसाठी करावयाच्या कोणत्याही अस्थायी नेमणुका सहा महि-न्यांहुन अधिक नसलेल्या कालावधीसाठी स्थायी समितीच्या पुर्व मंजुरीने या अटीवर करता येतील की आयुक्ताने अशी प्रत्येक नेमणुक करताना त्या विषयी महानगरपालिकेस ताबडतोब कळविले पाहीजे आणि उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर महानगरपालिकेच्या पुर्व मंजुरी वाचुन अशा कोणत्याही - नेमणुकीचे नवीकरण करता येणार नाही.

(२) पोट - कलम (१) मध्ये अन्यथा तरतुद केली असेल त्याव्यतिरिक्त, नगरपालिका मुख लेखापरिक्षक व - नगरपालिका सचिव यांच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखालील नगरपालिका अधिकारी व कर्मचारी-मग ते तात्पुरते असोत किंवा कायम असोत - यांची नेमणुक करण्याचा अधिकार कोणत्याही बाबतीत स्थायी समितीची मा-न्यता मिळविण्याचा अधीन, यथास्थिति, नगरपालिका मुख्य लेखापरिक्षक किंवा नगरपालिका सचिव यांच्याकडे निहीत असेल.मात्र , कोणत्याही विशिष्ट प्रकरणात किंवा प्रकरणांच्या वर्गात अशा मान्यतेची आवश्यकता नाही असे उक्त समितीने ठरविले तर अशी मान्यता घेण्याची आवश्यकता असणार नाही.

(३) या अधिनियमात अन्यथा तरतुद केली असेल त्याव्यतिरिक्त, नगरपालिका अधिकारी व कर्मचारी - मग ते कायम असोत किंवा तात्पुरते असोत- यांची नेमणुक करण्याचा अधिकार आयुक्तांकडे निहीत असेल ;

परंतु , कायम नेमणुकांच्या बाबतीत असा अधिकार कलम ५१ अन्वये तयार केलेल्या व मंजुर केलेल्या, त्यावेळी अंमलात असलेल्या विवरणपत्राच्या अधीन असेल :

आणखी असे की, आयुक्तास स्थायी समितीच्या पुर्व मंजुरी वाचुन कोणतीही तात्पुरती नेमणुक सहा महिन्यांहुन अधिक असेल अशा कोणत्याही कालावधीसाठी करता येणार नाही आणि लिपिक या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदाच्या वेतनाएवढे अथवा त्याहुन अधिक वेतन असलेल्या

कोणत्याही नेमणुकीचे उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर नवीकरण करता येणार नाही ."असे - नमुद केलेले आहे.

तरी श्री. स्वप्निल बाळकृष्ण पवार यांचे उपरोक्त विनंती अर्जानुसार व त्यावरील मा.मॅकेनिकल इंजिनियर यांचे कडील जा.क्र.मोटार व्हेईकल विभाग ३ दि.१०/४/२०१३ च्या अहवालाच्या अनुषंगाने मोटार व्हेईकल विभागाकरीता कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात अ‍ॅटोमोबाईल इंजिनियर (कनिष्ठ अभियंता) या पदावर अटी व शर्ती नुसार श्री. स्वप्निल बाळकृष्ण पवार यांची तांत्रिक खंड देवून पुढील सहा महिन्याकरीता दरमहा रू.२०,०००/- (रूपये वीस हजार फक्त) या मानधनावर मोटर व्हेईकल विभागामध्ये करारबध्द नियुक्ती करणे बाबत मा. मुख्य लेखा परिक्षक व मा. मुख्य लेखाधिकारी यांचा अभिप्राय होवून निर्णय झाल्यास सदरच्या प्रस्तावास पुर्व मंजूरी मिळणेकरीता मा. स्थायी समितीकडे सदरचा प्रस्ताव पाठविणे करीता मंजूरीसाठी निर्णयास्तव आदेशार्थ सविनय सादर. **/अ**

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर सहा.आयुक्त यांचा अभिप्राय की,स्थायीसमितीकडे प्रस्ताव पाठविणे योग्य सबब आदेशार्थ .

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत **"अ"** प्रमाणे मान्यतेस्तव सादर.

यावर आयुक्त साहेब यांची अभिप्राय की **"अ"** नुसार मान्य.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

## चर्चा :-

मा.सभापती साहेब :- मोटार व्हेईकल विभागाकरीता कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (अ‍ॅटोमोबाईल इंजि.) यापदी श्री. स्वप्निल बाळकृष्ण पवार यांची अटी व शर्ती नुसार सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द नियुक्ती करणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.सौ.गंधे सु.मो. :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

ऑफिस रिपोर्ट वाचनू दाखविण्यांत आला.

मा.सौ.गंधे सु.मो. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. सातपुते दि.ना. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- तांत्रिक अभियंत्याची कमतरता विचारात घेता ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**ठराव :-**अहमदनगर महानगरपालिकेचे मोटार व्हेईकल विभागाकरीता कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (अ‍ॅटोमोबाईल इंजि.)यापदी श्री.स्वप्निल बाळकृष्ण पवार यांची अटी व शर्तीनुसार सहामहिन्याकरीता दरमहा रू.२०,०००/-(रूपये वीस हजार फक्त) मानधनावर करारबध्द नियुक्तीकरणेस मंजूरी देण्यांत येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर,खर्च मंजूर. नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावा.

सुचक :- मा.सौ. गंधे सुमन मोहनीराज सही /-

अनुमोदक :- मा.श्री. सातपुते दिलीप नानाभाउ सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ०३**

विषय क्रमांक- ११८ शनिवार दिनांक १/०६/२०१३

ठराव क्रमांक -११८ शनिवार दिनांक १/०६/२०१३

**प्रस्तावाचा विषय :-** मे.प्रसन्ना पर्पल मोबीलिटी सोल्यु. प्रा.लि.चे व्यवस्थापक श्री. दिपक मगर यांनी दिनांक २७/०५/२०१३ रोजी दिलेल्या पत्रानुसार अहमदनगर महानगरपालिका शहर बससेवा दि. १ जून २०१३ पासून बंद करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर म.न.पा. मोटार व्हेईकल विभाग दिनांक २८/५/२०१३

संदर्भ - प्रसन्ना पर्पल मोबिलिटी सोल्युशन प्रा.लि. यांचेकडील पत्र जा.क्र. १३ दि.२७/५/२०१३

अहमदनगर महानगरपालिका शहर बससेवा चालवितांना अभिकर्ता संस्थेस आजपावेतो सुमारे १ कोटी रूपयांपेक्षा अधिक तोटा झाल्याने तसेच दि.११/०५/२०१३ व दि.२३/०५/२०१३रोजी डिझेलच्या दरामध्ये वाढ झाल्याने अभिकर्ता संस्था तोटयात असून अपेक्षित उत्पन्न मिळत नसल्याने सदरची बससेवा शनिवार दि.१ जून २०१३ बंद करण्यांत येत असल्याबाबत तसेच नोटीस क्र.०२ दि.११/१/२०१३ व क्र.०६ दि.०८/०२/२०१३ बाबत देखील अवलोकन करण्याबाबत अभिकर्ता संस्थेने कळविले आहे.

उपरोक्त नोटीस क्र.०२दि.११/१/२०१३अन्वये शहर बससेवेस इंधन दरवाढ,वर्कशॉप, वाहनतळ, बेकायदा प्रवासी वाहतूक इत्यादी मुळे होणारा तोटा लक्षात घेवून बससेवा १०फेब्रुवारी २०१३ पासून बंद करणे बाबत कळविले होते. तसेच नोटीस क्र.०६, दि.०८/०२/२०१३ अन्वये करारनामा बाब क्र.१८ नुसार १० एप्रिल २०१३ पासून अथवा तद्नंतर बससेवा बंद करणेबाबत कळविले होते. सदरच्या नोटीशी बाबत प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या निदर्शनास आणणेकामी देण्यात आला होता. शहर बससेवेस तिकीट दरवाढ देण्यांत आली होती. अवैध प्रवासी वाहतूकी बाबत वरिष्ठ स्तरावर कळविण्यांत आले होते. वाहन तळाकरीता जागा दाखविण्यांत आलेल्या आहेत तद्नंतर चर्चा होवून अभिकर्ता संस्थेने बससेवा पुर्ववत कार्यरत ठेवलेली आहे. दरम्यानचे काळात मा. पालकमंत्री, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ यांचेशी चर्चा तसेच पत्रव्यवहार करण्यांत येवून जुन्या स्टॅण्ड मागील जागा बससेवेसाठी उपलब्ध करणे बाबत मा.स्थायी समिती ठराव क्र.२०दि.०४/०५/२०१३ मंजूरी नुसार पत्रव्यवहार देखील करण्यात आलेला आहे.

मा.पालकमंत्री महोदय यांचे मुंबई येथील निवासस्थानी झालेल्या बैठकीमध्ये मे. प्रसन्ना पर्पल मोबिलिटी सोल्यू. प्रा.लि. या संस्थेचे श्री. पटवर्धन , श्री. परदेशी इ. हजर होते. सदर वेळी त्यांची बससेवा चालू ठेवणे बाबत होकार दिलेला होता.

तद्नंतर नवी दिल्ली येथील हुडकोच्या कार्यक्रमाच्या वेळीही शहर बससेवेबाबत चर्चा झाली असता सदर वेळीही शहर बससेवा अखंडीत चालू राहील असे सांगितले होते.

अहमदनगर महानगरपालिकेने शहर बससेवा सुरळीत चालू राहणे करीता सर्वतोपरी सहकार्य केलेले आहे. जागेचा प्रश्न देखील लवकरच मार्गी लागण्याची शक्यता आहे. अभिकर्ता संस्थेने मागील नोटीशीचा आधार घेत बससेवा दि. ०१ जून २०१३ पासून बंद करणे बाबत इकडेस कळविलेले आहे. करीता अभिकर्ता संस्थेस वरील प्रमाणे कळविणेबाबत तसेच अभिकर्ता संस्थेचे पत्र मा. स्थायी समितीच्या निदर्शनास आणणेस्तव मा.स्थायी समितीकडे सादर करणे योग्य. मान्यतेस्तव सादर.

येणेप्रमाणे मोटार व्हेईकल क्लार्क यांचा अहवाल असे.

**सोबत-** १] नोटीस क्र.०२ दि.११/०१/२०१३, २] नोटीस क्र.०६ दि.०८/०२/२०१३
३] नोटीस क्र.१३ दि.२७/५/२०१३, ४] मा.स्थायी समिती ठराव क्र.२० दि.०४/०५/२०१३,
५]अहमदनगर मनपा व अभिकर्ता संस्था यांचेमधील करारनामा

यावर मॅके. इंजि. पा.पु. यांचा अभिप्राय की, अहवालानुसार सदरचे पत्र मा.स्थायी समितीच्या निदर्शनास आणणे योग्य असुन, बससेवा बंद करू नये याबाबत अभिकर्ता संस्थेस पत्र देणे योग्य. मान्यतेस्तव सादर.

यावर उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, प्रस्तावानुसार कार्यवाही होणे योग्य सबब आदेशार्थ.

यावर आयुक्त साहेब यांची अभिप्राय की, मान्य

--**--

**प्रसन्ना पर्पल मोबिलिटी सोल्युशन्स प्रा.लि.**

**(अहमदनगर महानगरपालिका शहर बससेवा उपक्रम अभिकर्ता संस्था)**

जा.क्र. १३/२०१३ दि.२७/५/२०१३

मा.आयुक्त साहेब,
अहमदनगर महानगरपालिका

विषय- अहमदनगर महानगरपालिका परिवहन बससेवा (AMT) बंद करण्याबाबतच्या नोटीसीच्या अनुषंगाने शहर बससेवा बंद करणेबाबत.

संदर्भ :- १. नोटीस क्र.०२/२०१३ दि.११/०१/२०१३
२.नोटीस क्र.०६/२०१३ दि.०८/०२/२०१३

संदर्भित नोटीसीचे कृपया अवलोकन व्हावे.त्यातील संदर्भ क्र.०२मध्ये अ.नगर महानगर परिवहन शहरबससेवा दि.१०एप्रिल२०१३पासून अथवा तद्नंतर बंद करण्याबाबत रितसर कळविले. आहे.

या अनुषंगाने कळविण्यात येत आहे की, अभिकर्ता संस्थेला शहर बससेवा सुरू केल्यापासून आजपावेतो,सुमारे १कोटी रूपयांपेक्षा अधिक संचित तोटा झाला आहे. दि.११/०५/२०१३ व दि.२३/०५/२०१३रोजी डिझेलच्या दरामध्ये मोठी वाढ झाल्याने अभिकर्ता संस्थेचे तोटयात अधिकच भर पडली आहे. तरीही अभिकर्ता संस्थेने सेवा चालू ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न करूनही प्रवासी संख्या व त्याद्वारे मिळणारे उत्पन्न यात अपेक्षीत वाढ झालेली नाही. परिणामी कामगारांच्या वेतनाचा प्रश्न निर्माण झाला आहे.या परिस्थितीत अभिकर्ता संस्था प्रस्तुत शहर बस यापुढे चालविण्यास असमर्थ आहे. करीता सदरची शहर बससेवा नाईलाजास्तव शनिवार दि.०१ जून २०१३ पासून बंद करण्यांत येत आहे.

सही /-
( दिपक मगर)
व्यवस्थापक,
प्रसन्ना पर्पल मोबि. सो.प्रा.लि.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**<u>चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका शहर बससेवा दि. १ जून २०१३ पासून बंद करणे बाबत विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री.शेख आफिर शे.र. :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखववावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.सभापती साहेब :- आपण त्यांना वेळोवेळी भाडे वाढ देतो मग त्यांनी बससेवा बंद करण्याच कारण काय ? त्यांच्या प्रतिनिधीला बोलवा.

प्रसन्ना पर्पल मोबिलिटी सोल्युशन्स प्रा.लि. यांचे प्रतिनिधी म्हणून व्यवस्थापक श्री. दिपक मगर श्री. निखील वैदय हे सभेमध्ये उपस्थित झाले.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- त्यांच्या मागण्यांची काय पुर्तता केली त्यांना जागा दिली का ? रिक्षामध्ये येउ नयेत याची व्यवस्था केली का ? उपायुक्त डॉ. डोईफोडे साहेब त्यांना जागा अपुरी असेल तर जागा दया.

मॅके.इंजि. श्री. निकम पी.जे. :- त्यांना जागेची मुख्य अडचण आहे. त्यांना ४ जागा दाखविण्यांत आल्या होत्या डेपो करीता अमरधाम जवळील जागा दाखविली पंरतू नंतर कोर्टामध्ये वाद गेला. वाडियापार्कच्या मागील जागा दाखविण्यांत आली होती याबाबत मा. जिल्हाधिकारी , पोलिस अधिक्षक यांचेशी चर्चा केली. मिटींग झाल्या होत्या पण क्रिडा अधिका-यांनी हरकत घेउन जागा देण्यास नकार दिला. बुरूडगांव रोडवरील जागा ही डेपोकरीता लांब व सुरक्षित नाही असे अभिकर्ता म्हणतात. २ री अडचण बस सोडण्याच्या जागेची आहे. मुंबई येथे मा.पालकमंत्रीच्या उपस्थित झालेल्या बैठकीमध्ये एस.टी. महामंडळाची मागील बाजूची जागा भाडेतत्वावर घेण्याचे ठरलेले आहे. त्यानुसार स्थायी समितीने ठराव दयावा असे ठरले त्याप्रमाणे स्थायी समिती ठराव दिला आहे. रिक्षा उभ्या रहातात याकरीता पोलिस अधिक्षक व डेप्यु.आर.टी.ओ. यांचेशी चर्चा केली आहे.त्यांना जागेचा महत्वाचा प्रॉब्लेम आहे. बस उभ्या राहिल्यानंतर रिक्षावाले तेथे येउन लोकानां बसमध्ये बसू देत नाही. महत्वाची अडचण रिक्षाबाबतची आहे. आपल्याकडून प्रयत्न सगळया थरावर चालू आहे.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- बससेवा बंद का करतात.

मा.सभापती साहेब :- आपण त्यांना जागा देउ शकतो नाही. तर त्यांनी घेतलेल्या भाडयाने जागेचे भाडे आपण देउ असे करारामध्ये आहे का ?

मॅके.इंजि. श्री. निकम पी.जे. :- त्यांची आर्थिक तोटयाची बाब आहे त्यांची प्रसन्नाचे जे अधिकारी आले त्यांनी अडचण सांगावी. त्यांनी आज पत्र दिले ते मी वाचून दाखवतो.

प्रसन्ना पर्पल मो.सो. प्रा.लि. व्यवस्थापक श्री. दिपक मगर :- आजच्या दि.१ जून २०१३ रोजी मा. आयुक्त यांचे महोदय पत्र देतो की, १] अभिकर्ता संस्थेने उपरोक्त संदर्भ क्र.१ चे पत्राद्वारे अभिकर्ता संस्थेला शहर बससेवा सुरू केल्यापासुन आजपावेतो सुमारे १.२५ कोटी रूपयांपेक्षा अधिक संचित तोटा झाला असल्याने नाईलाजास्तव शनिवार दि. ०१ जून २०१३ पासून सदर सेवा बंद करण्यात येत आहे असे कळविले आहे. २] अभिकर्ता संस्थेचे दि.२७/०५/२०१३ चे पत्राचे अनुषंगाने आपण आपले संदर्भिय पत्राद्वारे शहर बससेवा उपक्रम कोणत्याही परिस्थितीत बंद करू नये. असे कळविले आहे. तसेच आपण अभिकर्ता संस्थेला चर्चेकरीता पाचारण केले.

३] दि.३०/५/२०१३ रोजी मा. महापौर महादेया, अ.नगर मनपा यांचे दालनात आपल्या तसेच प्रमुख पदाधिकारी यांचे उपस्थितीत आपण घडवून आणलेल्या चर्चेत अभिकर्ता संस्थेच्या अडचणी , जागेचा प्रश्न, अहमदनगर शहरात अनधिकृत रिक्षांचे संख्येत झालेली बेसुमार वाढ, डिझेलचे वाढणारे दर, खालावलेली शहर बसची प्रवासी संख्या हया सर्व विषयांवर सांगोपांग चर्चा झाली असून प्रस्तुत चर्चेमध्ये अत्यंत सकारात्मक भूमिका घेवून मनपा पदाधिका-यांनी शहर बससेवा सुरू ठेवण्याकरीता अभिकर्ता संस्थेला आर्थिक मदत देण्याबाबत सहानूभूतीपुर्वक विचार करण्याचे आश्वासन दिले. त्याबद्दल आपले मनपुर्वक धन्यवाद ! ४] प्रस्तूत परिस्थितीत झालेला प्रचंड तोटा पाहता अभिकर्ता संस्था शहर बस वाहतूक सुरू ठेवून तोटयामध्ये वाढ करू इच्छित नाही. तसेच अभिकर्ता संस्थेला कामगार वेतनाचा प्रश्न निर्माण झाला आहे. अभिकर्ता संस्थेला इंधन, सुटेभाग, टायर इत्यादी पुरविणा-या पुरवठादाराची थकबाकी साचली आहे व अशा परिस्थितीत मनपा पदाधिका-यांनी अभिकर्ता संस्थेला आर्थिक मदत देवून विना तोटा सेवा सुरू ठेवण्यास सकारात्मक भूमिका घेतली असल्याने त्या अनुषंगाने खालील बाबी मांडण्यात येत आहेत. ४-१] शहर बससेवेचा सर्वाधिक खर्च इंधनावर होतो. शहर बससेवा फेब्रुवारी २०११ मध्ये सुरू करण्यात आली तेव्हा डिझेलचा दर प्रति लिटर रू.४१.५२ इतका होता व सध्याचा दर रू.५६.४० इतका झाला आहे. म्हणजे डिझेलच्या दरामध्ये रू.१४.८८ प्रति लिटर वाढ झाली आहे.

डिझेल खर्चाची माहे. नोव्हेंबर २०१२ पासूनची आकडेवारी खालील प्रमाणे (आकडे लाखात)

| अ.नं. | महिना | लिटर (खप) | खर्च | प्रति लिटर १४.८८ प्रमाणे होणारी वाढ |
|---|---|---|---|---|
| १ | नोव्हेंबर-१२ | ०.२५ | १३.०४ | ३.७४ |
| २ | डिसेंबर-१२ | ०.३१ | १६.१२ | ४.६२ |
| ३ | जानेवारी-१३ | ०.३४ | १७.८२ | ५.०१ |
| ४ | फेब्रुवारी-१३ | ०.२८ | १५.०१ | ४.१९ |
| ५ | मार्च-१३ | ०.२९ | १५.४५ | ४.२६ |
| ६ | एप्रिल-१३ | ०.२७ | १४.६७ | ४.०३ |
| ७ | मे-१३ | ०.२८ | १५.२९ | ४.१२ |

४-२] डिझेल दरवाढीमुळे खर्चात होणारी वाढ भरून काढणे करीता शहर बस दरभाडे हा पर्याय आतापर्यत वापरात येत होता. परंतू सुमारे ४००० इतक्या संख्येने असलेले अनधिकृत रिक्षा चालक शहर बसपेक्षा कमी दरात जास्त संख्येने प्रवासी उचलतात त्यामुळे शहर बसची प्रवासी संख्या अधिकच घटते असा प्रत्यक्षात अनुभव आल्याने वाढलेले दर अभिकर्ता संस्थेने कमी करून प्रवासी संख्या कमी न होण्याकरीता प्रयत्न केले आहेत. अशा परिस्थितीत दरमहा डिझेल खर्चातील १० टक्के वाटा मनपा ने उचलल्यास दरमहा १.२५ ते १.५० लाख रूपयांपर्यत अभिकर्ता संस्थेचा डिझेल वर खर्च कमी होउ शकेल व ही बाब अभिकर्ता संस्थेचा इतका तोटा कमी करू शकते. ५] जागेचे भाडे :- अभिकर्ता संस्थेस महानगरपालिकेकडून वाहनतळ, वर्कशॉप, ऑफिस करीता जागा न मिळाल्यामुळे अभिकर्ता

संस्थेने ओम गार्डन, येथील खाजगी जागा दरमहा रू.६०,०००/-भाडे तत्वावर घेतली असून त्याकरीता आजपर्यंत भाडयापोटी अभिकर्ता संस्थेस १३.८० लाख रूपये अदा करावे लागले आहेत. दि.३०/५/२०१३ चे वरील बैठकीत मनपा पदाधिका-यांनी सदर भाडे मनपा कडून देण्याचे मान्य केले आहे. सुरूवातीपासून अभिकर्ता संस्थेने सदर भाडेची मागणी केलेली असूनही आजपर्यंत मनपा कडून सदर जागेचे भाडे मिळालेले नाही. या बाबीवर सदर बैठकीत मनपा पदाधिकारी एकमत झाले असून या अनुषंगाने अभिकर्ता संस्था विनंती करते की, अभिकर्ता संस्थेची साचलेली वरील भाडे रकमेची थकबाकी एक रकमी स्वरूपात मिळाल्यास सध्याचे अवघड परिस्थितीत अभिकर्ता संस्था हया निधीचा उपयोग देणेकरांचे देणे चुकविण्याकरीता करू शकेल. त्यामुळे शहर बससेवा चालू ठेवण्याकरीता साहित्या पुरवझा करण्याचा व्यापारी संस्था शहर बसला पूर्ववत साहित्य पुरवठा करू शकतील. ६] प्रवासी कर व बालपोषण अधिभार :- अभिकर्ता संस्थेला प्रवासी उत्पन्नाचे ३.५% प्रवासी कर व विक्री झालेल्या प्रत्येक तिकीटावर १५ पैसे दराने बालपोषण अधिभार शासनास दरमहा अदा करावा लागतो. अभिकर्ता संस्थेला पुरेसे उत्पन्न मिळो वा ना मिळो तिकीट रकमेचे ३.५% इतकी रक्कम प्रवासी कर म्हणून भरावी लागते. अभिकर्ता संस्थेला शहर बस वाहतूक चालविण्यात होत असलेल्या तोटयामुळे दि.०१/०५/२०१२पासून अभिकर्ता संस्थेवर प्रवासी कर व बालपोषण अधिभार थकीत आहे. मनपाने वरिष्ठ पातळीवरून शासन स्तरावर सदर करास करमाफी मिळवून दिल्यास किंवा सदर कराचे रकमे इतके अनुदान दिल्यास अभिकर्ता संस्थेला दरमहा रू.१.५लाख इतका निधी मिळू शकेल व तितका तोटा कमी होवू शकेल.७] सवलती :- अभिकर्ता संस्था अंध- अपंग व विद्यार्थ्यांना प्रवास भाडे दरात २०% सवलत देते. स्मार्ट कार्ड द्वारा विद्यार्थ्यांना अशी सवलत दिली जाते. ज्यांचा सुमारे १ लाख रूपयां इतका बोजा दरमहा अभिकर्ता संस्थेवर पडतो. सदर सवलत रकमेची प्रतिपूर्ती मनपा ने केल्यास अभिकर्ता संस्थेचा दरमहा तिका तोटा कमी होणेस मदत होईल. ८] बँक गँरटी :- मनपाकडे अभिकर्ता संस्थेने रू. १० लाख इतकी बँक गॅरटी रक्कम जमा केली आहे.सध्या अभिकर्ता संस्थ प्रचंड तोटयात असून आपण आपल्या पत्रात शहर बससेवा उपक्रम कोणत्याही परिस्थितीत बंद करू नये असे कळविले आहे. सध्याचे अवघड परिस्थितीत शहर बससेवा सुरू ठेवणे करीता संस्थेला पुरवठा करणा-या व्यापारी संस्थाचे देणे अदा करण्याकरीता मनपा ने सदर बँक गँरटीची रक्कम अभिकर्ता संस्थेला दिल्यास अभिकर्ता संस्था त्याद्वारे देणेदारांचे देणे देवू शकेल. परिणामी पुरवठादार पुनश्चः पुरवठा करू शकतील. ९] नफा-तोटा :- दरमहा येणारे प्रवासी उत्पन्न व होणारा खर्च यांचे विवरण अभिकर्ता संस्था आपणास सादर करून विना तोटा सेवा देणे शक्य होणे करीता मनपाने तोटा भरपाई निधी (Loss Funding) उभारणी करण्याची अभिकर्ता संस्था विनंती करीत आहे. सर्व शासकीय यंत्रणाचे सहकार्य लाभल्यास व अनाधिकृत ॲपे रिक्षा वाहतूकीवर प्रतिबंध आल्यास मनपाला असा निधी खर्च करण्याची आवश्यकता पडणार नाही. परंतू ज्या महिन्यात तोटा होईल त्या तोटा रकमेची प्रतिपूर्ती मनपाने करावी अशी अभिकर्ता संस्था विनंती करीत आहे. प्रस्तुत उपक्रमास असे आर्थिक साहाय्य न मिळाल्यास अभिकर्ता संस्था यापुढे तग धरू शकणार नाही व सदर सेवा निधी अभावी आपोआप बंद होईल त्याकरीता अभिकर्ता संस्थेचा नाईलाज असेल याची कृपया नोंद घ्यावी.

दि.३०/५/२०१३ चे बैठकीत आपण व मनपा पदाधिका-यांनी दि.०१/०६/२०१३ पासून बससेवा बंद करू नये बाबत केलेल्या विनंती नुसार हया संस्थेने दिलेली सेवा बंदची नोटीस अबाधीत ठेवून सदर सेवा तुर्तास सुरू ठेवण्यात येत आहे.

मा.सभापती साहेब :- बससेवा चालू ठेवणार आहेत. त्यांच्या अडीअडचणी सोडविण्याकरीता त्यावर प्रशासनाने सविस्तर प्रस्ताव कायदेशीर बाबी तपासून सादर करावा.

शहर बस प्रतिनिधी श्री. निखिल वैदय :- आम्ही मुद्दे मांडले आहेत. आम्हाला ही सेवा चालवणे अशक्य आहे. रू.१० लाख दरमहा तोटा आहे. पुरवठादारांचे बिले पगार देणे शक्य नाही.

मा.सभापती साहेब :- पत्रानुसार काय शक्य आहेत ते पहातो.

शहर बस प्रतिनिधी श्री. निखिल वैदय :- आता आम्हाला यापुढे चालविणेच शक्य होत नाही.

मा.श्री. भोसले ग.पुं. : मेन प्रॉब्लोम काय आहे.

शहर बस प्रतिनिधी श्री. निखिल वैदय :- बेकायदा रिक्षा वाहतूक, बससेवा सोडायला जागा नाही थांब्यावर थांबवायला जागा नाही. डिझेल वाढ खुप झाली. कालाच ०.५० पैसे वाढले आहेत. रिक्षांवर कारवाई व्हायला पाहिजे

मा.श्री. डागवाले कि.आ. :- मा.स्थायी समितीचे सदस्य घेउन मा. जिल्हाधिकारी , पोलिस अधिक्षक यांचेकडे जाउ . आपली जुनी कचरा डेपोची जागा देउ.

मा.सभापती साहेब :- विषय तपासून मार्गी लावू

शहर बस प्रतिनिधी श्री. निखिल वैदय :- आम्ही किती दिवस थांबायचे आम्हाला नक्की तारीख सांगा.

मा.सभापती साहेब :- १ महिन्यात विषय मार्गी लावू.

शहर बस प्रतिनिधी व्यवस्थापक श्री. दिपक मगर :- आज बससेवा सुरू ठेवण्याची आमची परिस्थिती नाही कामगाराचे पगार दयायला पैसे नाही. डिसेलला पैसे नाही. महानगरपालिकेने नुकसानीत भागीदार व्हायला पाहिजे. आमचा १ कोटीचा तोटा झाला. आता आम्ही बस सेवा चालवू शकत नाही. सन २०११-१२ मध्ये १७ हजार पॅसेंजर गाडीत बसवयाचे आता अवैध वाहतूक वाले जर प्रवासी उचलू लागेल तर आम्ही काय करणार आज ही संख्या १२००० प्रवासीवर आलेली आहे. आम्ही भाडेवाढ मागत होतो. तर आमच थोड फार कव्हर होत होते. परंतू आता भाडेवाढ मागणी करूनही उपयोग नाही.रिक्षा चालक कमी दराने प्रवासी घेतात.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- स्टॅंडींगचे सदस्य मिळून आपण कलेक्टर कडे भेटायला जाउ कचरा डेपोची जागा दया रोडवर जागा आहे. आपली स्वत:ची जागा असताना काय अडचण आहे.

मा.सभापती साहेब :- आम्ही सर्व सदस्य लवकरात लवकर निर्णय घेवू.

शहर बस प्रतिनिधी व्यवस्थापक श्री. दिपक मगर :- आता आम्ही काय करायच ते सांगा.

मा.सभापती साहेब :- एक महिन्यामध्ये सर्व विषय मार्गी लावू.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- प्रशासनाने सहकार्याच्या भुमिकेतून नियमानुसार तात्काळ प्रस्ताव सादर करावा.

मा.सौ. खरमाळे सं.र. :- बससेवा सुरू रहाणेकरीता कायदेशीर बाबी तपासून काय सहकार्य करता येईल तसा प्रस्ताव तातडीने सादर करावा.

मा.सभापती साहेब :- अभिकर्ता संस्था ही शहरामध्ये चांगली सेवा देत आहे. संस्थेस होणार तोटयाचा विचार होणे गरजेचे आहे. शहरातील गोरगरीब नागरिकांच्या सेवेसाठी व्यापक जनहिताच्या दृष्टीने ही सेवा चालू रहाणे आवश्यक आहे. अभिकर्ता संस्थेचे पत्राचा व अडीअडचणी विचार करून त्यांना महानगरपालिकेकडून करारनाम्यातील अटी व शर्ती नुसार आवश्यक त्या सहकार्याच्या दृष्टीने सविस्तर प्रस्ताव नियमानुसार तात्काळ सादर करण्यांत यावा. तसेच प्रवासीकर व बालपोषण अधिभार माफ करणे संदर्भात मा. शासनाकडे तात्काळ प्रस्ताव सादर करण्यांत येवून त्याचा पाठपुरावा करावा. यांस सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**ठराव :-** मे.प्रसन्ना पर्पल मोबीलिटी सोल्यु. प्रा.लि.चे व्यवस्थापक श्री. दिपक मगर यांनी दिनांक २७/०५/२०१३ रोजी दिलेल्या पत्रानुसार अहमदनगर महानगरपालिका शहर बससेवा दि. १ जून २०१३ पासून बंद करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट व अभिकार्ता संस्थेची प्रतिनिधींनी दिनांक १/६/२०१३ रोजीया पत्रावर झालेल्या चर्चेनुसार पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

अभिकर्ता संस्था ही शहरामध्ये चांगली सेवा देत आहे. संस्थेस होणार तोटयाचा विचार होणे गरजेचे आहे. शहरातील गोरगरीब नागरिकांच्या सेवेसाठी व्यापक जनहिताच्या दृष्टीने ही सेवा चालू रहाणे आवश्यक आहे. अभिकर्ता संस्थेचे पत्राचा व अडीअडचणी विचार करून त्यांना महानगरपालिकेकडून करारनाम्यातील अटी व शर्ती नुसार आवश्यक त्या सहकार्याच्या दृष्टीने सविस्तर प्रस्ताव नियमानुसार तात्काळ सादर करण्यांत यावा. तसेच प्रवासीकर व बालपोषण अधिभार माफ करणे संदर्भात मा. शासनाकडे तात्काळ प्रस्ताव सादर करण्यांत येवून त्याचा पाठपुरावा करावा.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. डागवाले किशोर आसाराम सही /

अनुमोदक :- मा.सौ. खरमाळे संगीता रत्नाकर सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका